MHPU180004462026

**<u>फौजदारी कि. अर्ज क्र. ४९/२०२६</u>**
शिला जेम्स गायकवाड वि. महाराष्ट्र सरकार
(राज्य उत्पादन शुल्क, दौंड.)

**<u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**
(दिनांक ०७.०३.२०२६)

अर्ज, म्हणणे व अभिलेख वाचले, दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

२. राज्य उत्पादन शुल्क, दौंड यांनी गु.र.क्र. २४५/२०२५ चे कामी मुंबई प्रोव्हीबिशन ॲक्ट ६५ (अ),(ई) अन्वये जप्त केलेले सुझुकी कंपनीची दुचाकी ॲक्सेस १२५ वाहन क्र. एम. एच. ४२ बी. जी. २८४० चासी क्रमांक **MB8DP12DDN8B40680,** इंजिन क्रमांक **AF217042192** परत मिळण्याकरीता अर्जदार शिला जेम्स गायकवाड, रा. संभाजीनगर, शिरापूर रोड, ता. दौंड, जि. पुणे यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. याबाबत तपासी अधिकारी यांनी नि. ६ नुसार जबाब दाखल केला असुन त्यामध्ये त्यांनी अर्जदार यांना सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल परत केल्यास ते सदरच्या गुन्हा केस कार्यवाहीकरीता हजर ठेवण्याची शाश्वती राहणार नाही, मुद्देमाल परस्पर विल्हेवाट लावण्याची, त्याच्या इंजिनमध्ये बदल करण्याची, इतर व्यक्तीकडे हस्तांतर करण्याची शक्यता व परत अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे, या बाबी नमुद करुन अर्जदारास मुद्देमाल परत न देण्याची विनंती केली आहे.

४. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा जबाब तपासी अधिकारी यांच्या जबाबावर लिहुन दिलेला आहे. त्यामध्ये अर्जदार यांना जप्त मुद्देमाल परत केल्यास परत अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता आहे. म्हणून त्यांनी मुद्देमाल परत न देण्याचे कथन केले आहे.

५. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ नि. ३ यादी लगत अर्जदाराने त्यांच्या आधारकार्डाची पडताळीत प्रत, जप्त वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राची पडताळीत प्रत, जप्त वाहनाच्या विमा प्रमाणपत्राची प्रत व प्रथम खबर अहवालाची पडताळीत प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेले आहेत. त्यावरुन असे निदर्शनास येते की, सदर गुन्ह्यातील जप्त वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे आहे. सदरहू वाहनावर इतर कोणीही दावा केला नसुन सदर अर्जास आक्षेपही नोंदविला नाही. सदरहू अर्जदार यांचे शपथपत्रावरील अर्ज व वरील बाबी वरुन अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच अर्जदार ही आरोपी नाही. सदरहू वाहन राज्य उत्पादन शुल्क, दौंड येथे वापराविना पडुन राहिल्यास त्याची उपयोगीता नष्ट होण्याची संभावना आहे. त्यामुळे गुन्ह्याचा प्रकार व एकंदर परिस्थिती तसेच माननीय सर्वोच्च न्यायालय यांचा ***<u>सुंदरभाई ...विरुध्द...गुजरात सरकार, ए.आय.आर. २००३, एस.सी.६३८</u>*** मधील न्यायनिर्वाळा बघता सदरहू वाहन यापुढे राज्य उत्पादन शुल्क, दौंड यांच्या ताब्यात

ठेवण्याची आवश्यकता दिसुन येत नाही. करीता सदर वाहन अर्जदारास उचीत अटी व शर्थीवर तात्पुरत्या स्वरुपात सुपूर्द करणे योग्य होईल. वरील परिस्थीती वरुन मी खालील आदेश पारीत करीत आहेः–

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. राज्य उत्पादन शुल्क, दौंड यांनी गु.र.क्र. २४५/२०२५ चे कामी मुंबई प्रोव्हीबिशन ॲक्ट ६५ (अ),(ई) अन्वये जप्त केलेले सुझुकी कंपनीची दुचाकी ॲक्सेस १२५ वाहन क्र. एम. एच. ४२ बी. जी. २८४० चासी क्रमांक **MB8DP12DDN8B40680,** इंजिन क्रमांक **AF217042192** हे र.रु.८०,०००/– (रुपये ऐंशी हजार फक्त) च्या सुपूर्दनामा बॉन्डवर तात्पुरत्या स्वरुपात अर्जदार शिला जेम्स गायकवाड, रा. संभाजीनगर, शिरापूर रोड, ता. दौंड, जि. पुणे यांना खालील अटी व शर्तीवर आदेशाप्रमाणे सुपूर्दनामा बॉन्ड राज्य उत्पादन शुल्क, दौंड येथे सादर केल्यानंतर परत करावे.

३. अर्जदाराने सदर गुन्ह्याचा निकाल लागेपर्यंत सदरचे वाहन सुस्थितीत ठेवावे, त्याचे रुप किंवा रंग बदलवु नये, तसेच त्यास कोणत्याही प्रकारे नुकसान पोहचवू नये, तसेच कोणालाही वाहन विक्री करु नये, त्याची विल्हेवाट लावु नये, वाहनाची आवश्यकता असल्यास न्यायालयात सादर करावे, त्याचा कोणत्याही गुन्ह्यात कोणत्याही प्रकारे उपयोग करु नये, तपासात व प्रकरणाचे कामकाजात मदत करावी व संबधीत वाहनाचे आवश्यक ते दस्तऐवज राज्य उत्पादन शुल्क, दौंड येथे सादर करावेत.

४. प्रस्तुत गुन्ह्याचे तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराच्या खर्चाने फोटो घेवुन त्याचा पंचनामा करावा व संपूर्ण कार्यवाही करुन त्याबाबतची कागदपत्रे, फोटो, बॉन्ड इत्यादी दोषारोपपत्रामध्ये या न्यायालयात नियमानुसार सादर करावे.

५. संबंधीत तपासी अधिकारी यांना नियमानुसार सुचना देण्यात यावी.

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.03.07 15:49:53 +0530

ठिकाणः– दौंड
दिनांकः– ०७.०३.२०२६

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दौंड, जि. पुणे

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | S. A. Kanaki |
| Name of the Court | :- | Smt. S. A. Virani,<br>J.M.F.C., Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 07.03.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 07.03.2026. |
| Order uploaded on | :- | 07.03.2026. |